श्री स.भु.शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर

## वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली जाहिरात

संस्थेच्या शाळातील खालीलप्रमाणे अनुदानित पूर्णवेळ रिक्त पदे मुलाखतीने भरण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत.

कनिष्ठ लिपिक = ०३ पदे   अनु.जाती = १ पद, अनु.जमाती = १ पद, खुला = १ पद

- अर्ज सादर करण्याचा अंतिम दि.१८/०७/२०२४ सायं.०५:३० वाजेपर्यंत आहे. विहित वेळेत अर्ज दाखल केलेल्या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक व वेळ पुढील नमूद संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.
- समांतर आरक्षणाची पदे त्या त्या प्रवर्गात पात्र व योग्य उमेदवार उपलब्ध असल्यास मुलाखतीतील गुणवत्तेनुसार भरण्यात येतील.
- अर्ज करण्याची पध्दत व इतर आवश्यक त्या माहितीसाठी उमेदवारांनी http://sbscience.org या संकेत स्थळावर School Recruitment या लिंकवर सातत्याने भेट द्यावी.

दि.०९/०७/२०२४

सरचिटणीस

**श्री स.भु.शिक्षण संस्था, छ.संभाजीनगर**
**(पदांचा तपशील : कनिष्ठ लिपिक (एकूण पदे = ३))**
**(अनु.जाती = १, अनु.जमाती = १, खुला = १)**
**उमेदवारांसाठी सूचना दि.१०/०७/२०२४**
**अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक १८/०७/२०२४ सांयकाळी ०५.३० वाजेपर्यंत**

१) अर्ज सादर करण्याच्या अंतीम दिनांक पर्यंत संपूर्ण भरलेले अर्ज संस्था कार्यालयात दाखल केलेल्या उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीचा दिनांक व वेळ श्री स.भु.विज्ञान महाविद्यालयाच्या http://sbscience.org या संकेतस्थळावर School recruitment या लिंकवर प्रसिद्ध करण्यात येईल. विहित वेळेत अर्ज सादर केलेल्या उमेदवारांनी सदरील संकेतस्थळास वेळोवेळी भेट द्यावी. तसेच, उमेदवारांना मुलाखतीच्या दिनांकाची माहिती वरील नमूद संकेतस्थळावरील लिंकवर प्रसिद्ध करण्यात येईल. तसेच, उमेदवारांनी अर्जात नोंद केलेल्या ई–मेल पत्त्यावर संक्षिप्तपणे सूचना कळविण्यात येईल. टपालाद्वारे मुलाखतीची सूचना पाठविण्यात येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

२) अर्ज स्वीकारण्याच्या अंतीम दिनांकास असलेले उमेदवाराचे वय ग्राह्य धरण्यात येईल. उमेदवाराची वयोमर्यादा किमान १८ वर्ष व कमाल वयोमर्यादा ३८ वर्ष असणे नियमानुसार बंधनकारक आहे. मागासवर्गीय उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा ४३ वर्ष आहे. समांतर आरक्षणाच्या बाबतीत शिथील केलेली वयोमर्यादा संबंधित प्रवर्गातील उमेदवारांना लागू राहील.

३) कनिष्ठ लिपिक पदासाठी शैक्षणिक अर्हता एच.एस.सी. आहे. इंग्रजी व मराठी टंकलेखनाची शासकीय मंडळाची परीक्षा उत्तीर्ण असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल. एम.एस.सी.आय.टी. प्रमाणपत्रासंदर्भातील अट शासन नियमानुसार असेल.

४) ज्या उमेदवारांना खाजगी शिक्षण संस्थांच्या शाळांमध्ये अथवा शिक्षण संस्थांमध्ये या पदांशी संबंधीत कामे करण्याचा अनुभव आहे, अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

५) या सूचना पत्रकासोबतच्या प्रपत्र–अ प्रमाणे नमूना अर्जात संपूर्ण माहिती भरलेले अर्ज, अनुक्रमांकानुसार कागदपत्रांच्या छायांकित प्रतींसह जाहिरात नमूद केलेल्या अंतीम दिनांक व वेळेपूर्वी ‘‘सरचिटणीस, मध्यवर्ती कार्यालय श्री स.भु.शिक्षण संस्था, औरंगपूरा, छत्रपती संभाजीनगर, (महाराष्ट्र) ४३१००१’’ या पत्यावर प्राप्त होतील, या दृष्टीने सादर करावेत. उशीरा प्राप्त होणारे (प्रत्यक्ष अथवा टपालाद्वारे) अर्ज मुलाखतीसाठी विचारात घेण्यात येणार नाहीत, याची सर्व संबंधीतांनी कृपया नोंद घ्यावी.

६) या पदावरील प्रथम तीन वर्षाचा कालावधी परिविक्षाधीन असेल. या कालावधीत शासन नियमाप्रमाणे रू.१०,०००/– प्रमाणे मानधन देय राहील. तीन वर्षे समाधानकारक काम केल्यानंतर या संदर्भातील नियमानुसार नियमित वेतनश्रेणीमध्ये वेतननिश्चिती करण्यात येईल.

७) या नियुक्त्यांना संबंधीत मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांची कोणत्याही कारणाने मान्यता प्राप्त न झाल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता संबंधीत उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

८) भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे नियुक्तीसाठी गैरमार्गाचा अवलंब केल्यास संबंधीत उमेदवारांना अपात्र ठरविले जाईल, याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

***

श्री स.भु.शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर.

अर्ज करावयाचे पद :–    अर्जाचा दिनांक –

| अ.क्र. | उमेदवाराची माहिती/विवरण | उमेदवारांनी सादर करावयाची माहिती | | |
|---|---|---|---|---|
| १ | उमेदवाराचे संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) | | | |
| २ | वडिलांचे संपूर्ण नाव | | | |
| ३ | आईचे नाव | | | |
| ४ | पत्ता(कायम) | | | |
| ५ | पत्ता(रहिवासी) | | | |
| ६ | ई–मेल आयडी | | | |
| ७ | मोबाईल नंबर | | | |
| ८ | अ) जन्म दिनांक | | | |
| | ब) जाहिरातीतील अंतिम दिनांकाच्या दिवशीचे वय :– | वर्ष-------- महिने------ दिवस----- | | |
| ९ | लिंग | | | |
| १० | राष्ट्रीयत्व | | | |
| ११ | अर्जदाराच्या सामाजिक आरक्षणाचा प्रवर्ग | | | |
| १२ | विवाहित/अविवाहित विवाहित असल्यास एकूण अपत्य संख्या | | | |
| १३ | २००५ नंतर जन्माला आलेली अपत्ये | | | |
| १४ | दिव्यांग/प्रकल्पग्रस्त/माजी सैनिक इत्यादी समांतर आरक्षणाचे उमेदवार असल्यास त्याचा प्रकार | | | |
| १५ | शैक्षणिक अर्हता | वर्ष | मिळालेले गुण | टक्केवारी/श्रेणी |
| | इयत्ता १० वी | | | |
| | इयत्ता १२ वी | | | |
| | पदवी (असल्यास) | | | |
| | पदव्युत्तर पदवी (असल्यास) | | | |
| १६ | इतर शैक्षणिक पात्रता :– | | | |
| १७ | खाजगी शैक्षणिक संस्थेत या पदासंबंधी अनुभव असल्यास त्याचा तपशील. | | | |

| | | |
|---|---|---|
| १८ | महाराष्ट्राचा रहिवासी असल्यास त्याचा पुरावा | |
| १९ | इतर कोणत्या शासकीय सेवेत असल्यास त्याचा पुरावा | |
| २० | अर्जदाराविरूद्ध कोणता गुन्हा दाखल आहे का? | |
| २१ | अर्जदाराविरूद्ध फौजदारी प्रक्रिया प्रलंबित आहे का? | |
| २२ | अर्जदारास फौजदारी न्यायालयाद्वारे शिक्षा करण्यात आली आहे का? | |

## हमीपत्र

मी --------------------------- खाली स्वाक्षरी करणार, घोषित करतो की, वरील नमूद सर्व माहिती ही माझ्या माहितीप्रमाणे सत्य असून, कोणतीही माहिती मी दडवून/लपवून ठेवलेली नाही.

मला याची पूर्ण जाणीव आहे की, या अर्जामध्ये नमूद माहिती जर असत्य, चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्यास माझा अर्ज अथवा या कागदपत्रांच्या व माहितीच्या आधारे करण्यात आलेली नियुक्ती रद्द समजण्यात येईल. तसेच, मी दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास कायद्यात नमूद इतर कायदेशीर कारवाईस व इतर सर्व शिक्षेस पात्र असेन.

दिनांक :

स्थळ : स्वाक्षरी

सोबत :- खालील प्रमाणपत्रांच्या सत्यप्रती जोडल्या आहेत :-

| अ.क्र. | प्रमाणपत्राचा तपशील |
|---|---|
| १ | |
| २ | |
| ३ | |
| ४ | |
| ५ | |
| ६ | |
| ७ | |
| ८ | |
| ९ | |
| १० | |